# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक ०४.१०.२०१० रोजी संपन्न झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिं.०४/१०/२०१० रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.४० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला उपआयुक्त श्री.अजय चारठाणकर नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
३. स.स.श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
६. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे
७. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
८. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
९. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
११. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१२. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१३. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१४. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१५. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१६. स.स.श्रीमती उर्मिला नितीन चित्ते
१७. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
१८. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन
१९. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२०. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२१. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२२. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२३. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
२५. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२६. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
२७. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
२८. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२९. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३०. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३१. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३२. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३३. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३४. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
३५. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
३६. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
३७. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
३८. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
३९. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४०. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४१. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्नीसा खाजा
४२. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
४३. स.स.डॉ.खान जफर अहेमद
४४. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४५. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४६. स.स.श्री.खान आगा मिया
४७. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४८. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
४९. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
५०. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५१. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण

५२. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत

५३. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव

५४. स.स.श्रीमती काथार रेखा कैलास

५५. स.स.श्री.संजय केनेकर किसनराव

५६. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव

५७. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा

५८. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल

५९. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर

६०. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप

६१. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल

६२. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव

६३. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद

६४. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे

६५. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर

६६. स.स.दिग्विजय संभाजी शेरखाने

६७. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम

६८. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव

६९. स.स.श्री.जोशी संजय रामदास

७०. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश

७१. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद

७२. स.स.श्री.जैन विकास रतनलाल

७३. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने

७४. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

७५. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश

७६. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

७७. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

श्री.काशिनाथ कोकाटे :या शहराचे आमदार मा.प्रदीपजी जैस्वाल यांच्या मातोश्री स्व.शंकुतलादेवी शिवनारायणजी जैस्वाल यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.गिरजाराम हळनोर :यास अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व.शंकुतलादेवी जैस्वाल यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.प्रमोद राठोड : औरंगाबाद शहर बस सेवा संदर्भात चर्चा विनिमय करणे असा आजच्या सभेचा विषय आहे.या संदर्भात कुठलीही माहिती स.नगरसेवकापर्यत आलेली नाही.एजन्सीच्या विरूध्द कुठे व काय गुन्हा दाखल झाला ॲग्रीमेंन्ट काय होते हे पेपरवरून ऐकायला मिळते स.सदस्यांना माहिती का दिली नाही याचा खुलासा देण्यांत यावा त्यानंतर पूढील चर्चा सुरू करावी.

श्री.संजय जोशी चार स्थायी समितीच्या सदस्यांनी दिलेल्या पत्रानुसार आजची सभा आयोजित केली.प्रशासनाने यात खुलासा केला नसेल परंतु झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने असे म्हणणे आहे की एसटी महामंडळाकडे ही सेवा देण्यासाठी सर्वसाधारण सभेची एनओसी आवश्यक आहे.माझे असे मत आहे की प्रशासनाने एएमटीच्या संदर्भात ०२ चौकशी अहवाल ,पोलीस स्टेशनमध्ये काय गुन्हा दाखल केला कोणते पत्र दिले त्यांची स्थळप्रत व एसटी महांमडळाकडून काय पत्र आले त्यात अटी शर्ती काय आहे या माहिती प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी या सर्व गोष्टीला कोणास जबाबदार धरणार व काय कार्यवाही करणार हे निर्णय या सभेत व्हावे.आज एनओसी न देता अटी शर्ती काय आहे याची प्रत सर्वांना देण्यात यावी नंतर ही सभा बोलवावी.

श्री.मुजीब खान :या विषयाच्या बाबतीतील चौकशी अहवाल व इतर माहिती मिळणे अपेक्षीत आहे आज मा.आयुक्त उपस्थित नाही स.सदस्य वेळेवर येतात २-२ विषयपत्रिका वाटप होतात जे अधिकारी उपस्थित आहे ते बरोबर खुलासा करणार नाही चौकशी अहवाल काय ,कोणती तक्रार दाखल केली याची माहिती आली नाही एक पानाची विषयपत्रिका दिली त्यावर काय चर्चा करावी प्रश्न पडतो एएमटीशी झालेला करारनामा व इतर सर्व कागदपत्राची एक प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.यापूर्वी सत्यम एजन्सीला कच-यापासून खत निर्मिती करण्याचे काम दिले त्यांनी महापालिकेची जागा बँकेकडे तारण ठेवली आजही प्रकरण तसेच पडून आहे महापालिकेला कार्यवाही करावी लागत आहे.तोच प्रकार एएमटीचा आहे सत्यम एजन्सी काम सोडून गेली आजही ती महापालिकेची जागा बँकेकडे तारण आहे त्या रक्कमेवर किती व्याज झाले प्रशासनाकडे माहिती नाही. एएमटीने बॅक गँरटी दिली सर्वसाधारण सभेपूढे आले नाही.कशाच्या अधारे बँक गॅरंटी दिली या सर्व बाबीचा व करारनामा तसेच चौकशी अहवालाची प्रत सर्व सदसंना देण्यात यावी नंतर ही सभा आयोजित करावी मा.आयुक्त आज व उदया दोन दिवस नाही उदयाची सभा सुध्दा स्थगित करावी नंतर घेण्यात यावी.

श्री.गिरजाराम हळनोर :घाई गरबडीने प्रस्ताव येणार मंजूर होणार त्यांचे काही परीणाम झाल्यास सभेनेच मंजूर केले असा ठपका पडायला नको बस सेवा बंद असल्यामूळे नागरीकांचे विदयार्थ्याचे हाल होत आहे तोडगा लवकर निघावा म्हणून बैठक बोलावली परंतु प्रशासनाकडून माहिती उपलब्ध न झाल्यामूळे व दोन चौकशी अहवाल, प्रशासनाने संचालका विरूध्द काय गुन्हा दाखल केला तसेच एसटी महामंडळाकडून जे पत्र प्राप्त झाले या सर्वाची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी. महापालिका एएमटी बस संस्थेला गॅरन्टर झालेले असल्याच्या बातम्या वृत्तपत्रात येतात परंतु तसा कोणताही प्रस्ताव या सभेपूढे आलेला नाही जर अशा प्रकारे कामे होत असतील तर गंभीर बाब आहे.या विषयावर चर्चा होत असतांना मा.आयुक्तांची उपस्थिती आवश्यक आहे तसेच माहिती पूर्ण दिलेली नाही ती सर्व सदस्यांना देण्यात यावी नंतर ही सभा बोलवावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :४ सदस्याच्या मागणी नुसार सभा बोलवली शहर बस सेवा असणे नागरीकाच्या व आपल्या सर्वांच्या जिव्हाळयाचा प्रश्न झलेला अरहे गेल्या २४ तारखेपासून बस सेवा बंद असून चौकशी अहवालाची प्रत काही सदस्यांना मिळाल्या काहींना नाही माझेकडे प्रत आहे.चौकशी होत राहिल. महापालिकेकडे वाहनचालक ऑलरेडी आहे.एएमटीच्या बसेस महापालिकेच्या मालकीच्या असून बस सेवा बंद असल्यामूळे शहरातील शालेय विदयार्थ्याचे होणारे हाल बघता , बस सेवा कुणी व कशी चालवायची हा प्रश्न नाही यास कुठलाही विलंब न लावता तात्काळ बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी आमचे सर्व राष्ट्रवादी पक्षातील सदस्यांची आहे.

श्री.संजय केनेकर :आताच म्हटले चौकशी अहवालाच्या प्रति दिल्या परंतु आणखीही चौकशी अहवालाच्या संदर्भात बरीच माहिती सदस्यांपर्यत पोहचली नाही.शहर बस सेवा बंद आहे ती चालू करणे आवश्यक आहे परंतु आपतकालीन परीस्थिती निर्माण होवू शकते महापालिकेने पर्यायी व्यवस्था ठेवणे आवश्यक होते की नाही पर्यायी व्यवस्था ठेवली नसेल तर का ठेवली नाही या परीस्थितीला एजन्सी की अधिकारीही जबाबदार आहे ही सर्व माहिती समोर यावी. जशी एजन्सीवर कार्यवाही करणार त्याच प्रमाणे ही परीस्थिती कुणामूळे निर्माण झाली यामध्ये अधिकारी दोषी आहेत का चौकशीचा अहवाल यावा जी परीस्थिती निर्माण झाली यात एकटया पक्षाचे नाव बदनाम होत नाही विदयार्थी पासेस हातात घेवून आपलेच लोक फोटो छापतात व या सभागृहाला बदनाम करण्यात येते. हे थांबविण्यास प्रशासन अपयशी ठरले प्रशासनाच्या चुकीमूळे बदनामी होत आहे याबाबतीत सर्व सविस्तर अहवाल येत्या ८ दिवसात तयार करून, सर्व सदस्यांना देवून जेंव्हा मा.आयुक्त सभेला असतील तेंव्हा ही सभा बोलवावी.

श्री.खाजा शरफोद्दीन :शहर बस सेवा बंद झाल्याने शालेय विदयार्थ्याचे तसेच नागरीकांचे मोठे हाल होत आहे  नागरीक व विदयार्थी पायी जा-ये करतांना दिसतात चौकशी होउन कार्यवाही होत राहिल परंतु शहर बस सेवा तात्काळ कशी सुरू करता येईल या बाबत कार्यवाही करावी बस सेवा बंद झाल्याने महापालिकेचे नाव बदनाम होत आहे. बस सेवा देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे.

मा.महापौर :प्रशासनाला आदेशीत करण्यात येते की एसटी महामंडळाकडून काय पत्र मिळाले तसेच अकोला प्रवासी वाहतून संघटनेवर काय गुन्हा दाखल केला विषयपत्रिके सोबत संपूर्ण अहवालाच्या प्रति दिलेल्या नाही या बाबतचा सविस्तर अहवालाच्या प्रति सर्व सदस्यांना देण्यात यावा

श्री.प्रमोद राठोड :एएमटी सोबत झालेला करारनामा व सर्वसाधारण सभेने कोणते नियम अटी शर्ती ठरवून दिल्या होत्या त्यानंतर अटी शर्ती मध्ये नंतर काय बदल करण्यात आले याचा देखिल माहिती द्यावी

श्री.खाजा शरफोद्दीन :एएमटीच्या संदर्भात कागदपत्र गहाळ झाले असे ऐकण्यात येते. असे झाले असेल तर संबधीत अधिका-यावर काय कार्यवाही करणार आहे.सर्व कागदपत्राच्या प्रति सदस्यांना देण्यात याव्यात

मा.महापौर :एएमटी कंपनी सोबत करारनामा करतांना जे नियम व अटी शर्ती ठरलेल्या होत्या त्याची प्रत प्रत्येक सदस्यांना देण्यात यावी.एएमटी बस सेवा हा महत्वाचा विषय असल्याने व आजच्या सभेला मा.आयुक्त उपस्थित नाहीत या बाबतीत प्रशासनामार्फत तपशिलवार प्रस्ताव सादर होणे अपेक्षीत आहे.अकोला प्रवासी वाहतूक संस्थेवर काय गुन्हा दाखल केला व प्रशासनाने दोन वेळेस जो अहवाल तयार केला त्याची तपशिलवार माहिती देणे आवश्यक आहे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने जो प्रस्ताव पत्र देवून महापालिकेकडे सादर केला त्याची माहिती सुध्दा सभागृहाला व्हावी व संपूर्ण माहिती प्रशासनाकडे प्राप्त झाल्यानंतर सर्व सदस्यांना देण्यात यावी व सभागृहाची भावना लक्षात घेवून आजची सभा तहकूब करण्यात येते.

श्री.संजय केनेकर :उदया दिं. ५-१०-२०१० रोजी होणारी अर्थसंकल्पीय सभा मा.आयुक्त नसल्यामूळे स्थगित करून नंतर घेण्यात यावी.

मा.महापौर :उदया होणारी अर्थसंकल्पीय सभा सुध्दा स्थगित करण्यात येवून नंतर घेण्यात येईल.सभेची तारीख व वेळ स्वतंत्ररित्या सर्व सदस्यांना कळविण्यात येईल.

यानंतर मा.महापौर यांनी सभा तहकूब केल्याचे  जाहीर केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद